जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026
पुढारी



# विद्यापीठामध्ये 'प्रबोधन'कार ठाकरे जयंती साजरी

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

शिवाजी विद्यापीठामध्ये 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.

मुख्य प्रशासकीय इमारतीमध्ये प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव व कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले.

यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राज्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, उपकुलसचिव दीपक अडगळे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, विनोद लोखंडे, सुनील वाजे, कुलदीप औटे, अवधूत गंगधर आदी उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026
सकाळ

# विद्यापीठात प्रबोधनकार जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठात आज प्रबोधनकार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती साजरी झाली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत सकाळी प्र-कुलगुरू डॉ.ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांच्या हस्ते प्रबोधनकार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. यावेळी डॉ. अजितसिंह जाधव, डॉ. सुखदेव उंदरे, नेहा वाडेकर, दीपक अडगळे, सुरेश बंडगर, विनोद लोखंडे उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026

जनप्रवास

# शिवाजी विद्यापीठामध्ये 'प्रबोधन'कार ठाकरे जयंती

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठामध्ये आज 'प्रबोधन'कार केशव सीताराम ठाकरे यांची जयंती उत्साहात साजरी केली. विद्यापीठाच्या मुख्य प्रशासकीय इमारतीत प्र-कुलगुरू डॉ. ज्योती जाधव आणि कुलसचिव डॉ. विलास शिंदे यांच्या हस्ते 'प्रबोधन'कार ठाकरे यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात येऊन अभिवादन केले. यावेळी परीक्षा व मूल्यमापन मंडळाचे संचालक डॉ. अजितसिंह जाधव, राज्यशास्त्र अधिविभागाचे डॉ. सुखदेव उंदरे, डॉ. नेहा वाडेकर, उपकुलसचिव दीपक अडगळे, सहायक कुलसचिव सुरेश बंडगर, विनोद लोखंडे, सुनील वाजे, कुलदीप औटे, अवधूत गंगधर यांच्यासह प्रशासकीय सेवक, विद्यार्थी-विद्यार्थिनी होत्या.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026
सकाळ


प्राजक्ता डवरी


वैभव कदम

# विद्यापीठातील दोन विद्यार्थी आंतरराष्ट्रीय रसोफिल परिषदेत

कोल्हापूर, ता. १७ : शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेचे विद्यार्थी वैभव कदम आणि प्राजक्ता डवरी मॉस्को (रशिया) येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय रसोफिल चळवळीच्या चौथ्या परिषदेत सहभागी झाले आहेत. ११ ते २० सप्टेंबर कालावधीत विविध कार्यक्रम होणार आहेत. प्राजक्ता रशियन भाषा एम.ए. प्रथम वर्षात, तर वैभव रशियन भाषा पदविका अभ्यासक्रमात शिकत आहे. यंदाची रसोफिल परिषद ही ऐतिहासिक स्मृती, रशिया आणि त्याचा प्राचीन इतिहास, संस्कृती, तसेच आध्यात्मिक-नैतिक परंपरांप्रति आदर या मूल्यांभोवती सहभागींना एकत्र आणणारा आंतरराष्ट्रीय सार्वजनिक मंच आहे. अशी माहिती रशियन भाषा शिक्षिका डॉ. मेघा पानसरे यांनी दिली. या विद्यार्थ्यांना ज्योती पाटील, विदेशी भाषा विभागाचे प्रभारी प्रमुख अक्षय सरवदे यांचे सहकार्य लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026
तरुण भारत

# आंतरराष्ट्रीय रसोफिल परिषदेत विद्यार्थ्यांची निवड





**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील रशियन भाषेचे विद्यार्थी वैभव कदम आणि प्राजक्ता डवरी यांची मॉस्को, रशिया येथे होणाऱ्या आंतरराष्ट्रीय रसोफिल चळवळीच्या चौथ्या परिषदेत सहभागासाठी निवड झाली आहे.

सदर परिषद १६ ते १८ रोजी दरम्यान झाली. शिवाजी विद्यापीठाच्या विदेशी भाषा विभागातील विद्यार्थ्यांची अशा आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिषदेसाठी झालेली निवड ही विद्यापीठासाठी, तसेच महाराष्ट्रातील रशियन भाषा-अध्ययन आणि सांस्कृतिक देवाणघेवाण क्षेत्रासाठी अभिमानाची बाब असल्याचे अधोरेखित झाले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
18 SEP 2026
पुढारी

# टेबल टेनिस स्पर्धेत विवेकानंद कॉलेज प्रथम

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठांतर्गत आष्टा येथील अण्णासाहेब डांगे कॉलेजमध्ये झालेल्या इंटर झोनल टेबल टेनिस (पुरुष) स्पर्धेत विवेकानंद महाविद्यालयाच्या संघाने विजेतपद पटकावले. अंतिम सामन्यात केआयटी कॉलेजचा ५-४ असा पराभव करत बाजी मारली. विवेकानंद कॉलेजने सलग तीन वर्षे इंटर झोनल टेबल टेनिस स्पर्धेत प्रथम क्रमांक मिळवत विजेतपदाची हॅट्ट्रिक साधली आहे. विजेत्या संघात ऋषिकेश नलवडे, आदर्श पाटील, पिनाक पाटकर, केतन सुतार आणि वरद दिवसे यांचा समावेश आहे. यशाबद्दल श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे यांनी खेळाडूंचे अभिनंदन केले. प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. विकास जाधव, प्रा. संतोष कुंडले, प्रा. प्रशांत कांबळे, एस. के. धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.